**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४२१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी - ०२२-२२८७१४९७ ईमेल - registry.sesd-mh@gov.in

क्रमांक : खरेदी-२०२१/प्र.क्र.२० /नोंदणी शाखा दिनांक : १० नोव्हेंबर, २०२१.

**(Tender Notice)**
**दरपत्रकाबाबतच्या सूचना**

कार्यालयीन संगणकांसाठी सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर-काट्रेज, पेनड्राईव्ह इ.)

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या विभागामधील संगणकांचे आवश्यक सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर-काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) खरेदी करण्यासाठी दिनांक १ डिसेंबर, २०२१ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ या एक वर्षाच्या कालावधीसाठी पुरवठादार नेमण्यासाठी शासनाच्या संकेतस्थळावरून पुरवठादारांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. पुढे नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन संगणक संबंधित आवश्यक सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर-काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) पुरविण्याबाबतची दरपत्रके दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ दुपारी ०३.३० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात, उपसचिव (नोंदणी शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, ४ था मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचे नावे पाठविण्यात यावीत.

२. याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

I. दिनांक १ डिसेंबर, २०२१ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीकरीता, सोबत जोडलेल्या यादीतील, विभागामधील संगणकांचे आवश्यक सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर-काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) पुरविण्यासाठी करार करावा लागेल.

II. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

III. निविदाकारांकडून त्यांची दरपत्रके दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत दुपारी ०३.३० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात उपसचिव (नोंदणी शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, ४ था मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचे नावे पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

IV. मोहोरबंद लिफाफ्यावर **"संगणकाचे आवश्यक सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर, काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) पुरवठा करण्याबाबत दरपत्रक"** असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये तांत्रिक निविदा मोहोरबंद करुन (Sealed envelope) दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

V. दरपत्रक फॉर्म्सवर, दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

VI. प्राप्त दरपत्रक दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी उपसचिव नोंदणी शाखा, दालन क्र. ४३६, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई येथे दुपारी ३.३० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

VII. दरपत्रकासोबतच्या विहित फॉर्म्र्सह, दरपत्रकाचे रु.१००/- (ना-परतावा) शुल्क भरावे लागेल.

VIII. निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यांनतर, मागणी करण्यात येणाऱ्या संगणकांचे आवश्यक सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर, काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) पुरवठा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे तात्काळ व स्वीकृत दरपत्रकानुसार करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

IX. संगणकांचे आवश्यक सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर-काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) पुरवठा केल्यानंतर दरमहा मुद्रांक पावतीसहीत देयके सादर करावीत. देयकाची रक्कम ECS द्वारे जमा करण्यासाठी बँक खात्याचा सविस्तर तपशिल सादर करणे आवश्यक राहील. परिपूर्ण देयके सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच, प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

X. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

XI. पुरवठादार संस्था नोंदणीकृत (उद्योग आधारधारक किंवा उद्योग नोंदणी प्रमाणपत्रधारक) असावी.

XII. पुरवठादार संस्थेचा स्वत:चा वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) आवश्यक राहील.

XIII. सोबत यादीत जोडलेल्या वस्तूंपेक्षा अन्य वस्तूंची आवश्यकता भासल्यास, सदर वस्तूंचा पुरवठा करणे आवश्यक राहील. सदर वस्तूंची हमी (warranty) आहे अथवा नाही, ते ही नमूद करणे, तसेच वस्तूंची हमी (warranty) असल्यास, त्याचा कालावधी किती राहील, त्याबाबतही नमूद करणे आवश्यक राहील. तसेच मागणी केलेल्या सर्व साहित्याचे दर चालू बाजारभावापेक्षा (छापील किमतीच्या) किमान <u>५ टक्के</u> कमी असणे बंधनकारक राहील.

XIV. (a) विभागाच्या आवश्यकतेनुसार वस्तूंची मागणी करण्यात येईल व मागणी केल्यावर सदर वस्तु निश्चित केलेल्या दराने व दर्जानुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

(b) पुरवठादाराकडून पुरविण्यात येणाऱ्या वस्तुंच्या दर्जात अथवा किंमतीत पुरवठादाराने कोणताही बदल केल्यास, सदर वस्तू नाकारणे तसेच करारनाम्याचे पालन समाधानकारक न झाल्यास करारनामा संपुष्टात आणणे, याबाबत शासनाचा निर्णय अंतिम राहील.

(c) पुरवठा केलेल्या वस्तूंचा दर्जा हा उत्तम असला पाहिजे.

३.	वरील “a” ते “C” बाबींची पूर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कारवाईस पात्र असेल व त्यास काळ्या यादीत (Black list) टाकले जाईल.

४.	उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे “तांत्रिक निविदा” दरपत्रक मध्ये नमूद असेल, तरच सोबत जोडल्याप्रमाणे यादीस अनुसरुन निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

स्वा. म. नानल

(स्वा. म. नानल)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

| अ.क्र. | वस्तुचे नाव | नामांकित कंपनीची नावे | क्षमता (G.B.) | हमी (warranty) | | किंमत (Price) | जीएसटी (GST) | एकूण किंमत (Total Price) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे/ नाही | कालावधी | | | |
| १ | Pen drive | | 32 GB | | | | | |
| २ | Pen drive | | 64 GB | | | | | |

Keyboard & Mouse Combo

| अ.क्र. | कंपनीचे नाव | मॉडेल क्रमांक | हमी (warranty) | | किंमत (Price) | जीएसटी (GST) | एकूण किंमत (Total Price) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आहे | नाही | | | |
| 1 | HP Modal | 160 | | | | | |
| 2 | Lenova | 4802 | | | | | |
| 3 | Logitech | MK 120 | | | | | |
| 4 | Dell | KB 216 | | | | | |
| 5 | IBALL | V3.0 | | | | | |

**Printer Cartridge**

| अ.क्र. | प्रिंटर काट्रेज क्रमांक | हमी (warranty) | | किंमत (Price) | जीएसटी (GST) | एकूण किंमत (Total Price) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आहे / नाही | कालावधी | | | |
| १ | Samsung ११६ | | | | | |
| २ | Brother ०२१ | | | | | |
| ३ | Brother ०२१ | | | | | |
| ४ | HP २६१२ A | | | | | |
| ५ | HP २८ A | | | | | |
| ६ | HP ८८ A | | | | | |
| ७ | HP ७८ A | | | | | |
| ८ | Ricoh ३१० | | | | | |
| ९ | Ricoh ३४१० | | | | | |
| १० | Canon ३३७ | | | | | |

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४२१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८७ १४८७ ई मेल-registry.sesd-mh@gov.in

क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र. /नोंदणी शाखा दिनांक : १० नोव्हेंबर, २०२१

**शालेय शिक्षण व क्रीडा विभागात दि.०१ डिसेंबर, २०२१ ते दि.३० नोव्हेंबर, २०२२ या एक वर्षाच्या कालावधीसाठी कार्यालयीन संगणकांसाठी सुटे भाग (की-बोर्ड, माऊस, टोनर-काट्रेज, पेनड्राईव्ह इ.) पुरवठा करण्याकरिता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत :-**

## तांत्रिक निविदा

| | | |
|---|---|---|
| १. | पुरवठादाराचे /संस्थेचे नाव | : |
| २. | संपूर्ण पत्ता/कार्यालय | : |
| ३. | दूरध्वनी (कार्यालय) | : |
| | मोबाईल क्रमांक | : |
| | फॅक्स | : |
| | ई-मेल | : |
| ४. | निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक | : दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ दु.३.३० वाजेपर्यत |
| ५. | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) | : |
| ६. | वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक | : |
| | (I) प्रमाणपत्र देणारे कार्यालय | : |
| | (II) प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक | : |
| | (III) वैधतेची मुदत | : |

७. दरपत्रकाच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**दिनांक :**

**स्थळ :** निविदाधारकाचे नाव व स्वाक्षरी

(**सूचना** : दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करणे आवश्यक असल्यास त्या ठिकाणी पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)